दै. लोकमत दि. 15/12/19

दै. लोकमत दि. 15/12/2019

# दरोड्याच्या तयारीतील आरोपी गजाआड

## विशेष पथकाची कामगिरी । अनेक दिवसांपासून होता फरार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** दरोड्याच्या तयारीत असलेल्या एका आरोपीच्या विरोधात भाग्यनगर ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता. परंतु त्यानंतर आरोपी फरारच होता. विशेष पथकाने या आरोपीच्या मुसक्या आवळल्या आहेत.

भाग्यनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याच्या तयारीत असलेल्या काही जणांना पोलिसांनी पकडले होते. त्यांच्याजवळून दरोड्यासाठी वापरण्यात येणारे शस्त्र व इतर साहित्य जप्त करण्यात आले. या प्रकरणातील आरोपी तेजपाल ऊर्फ तेजूसिंघ ऊर्फ तेज्या वांगा कुलवंतसिंघ चहेल याला विशेष पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे अटक केली. त्यानंतर त्याला भाग्यनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. आरोपी तेजपाल याला शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने त्याला दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. पोलीस अधीक्षक विजयकुमार मगर, अप्पर पोलीस अधीक्षक भोकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोनि. नरवाडे यांनी कारवाई केली.